# व.पु. काळे ... वपुर्झा मधील माझे आवडते उतारे

आमचा देव दगडाचा नाही. आम्ही दगडात देव पहाणारी माणसं आहोत. दगडात देव असतोच, मूर्ती असतेच. दगडाचा फक्त नको असलेला भाग काढून टाकायचा असतो. मूर्तीच्या भागाकडे फक्त लक्ष ठेवा. फेकून द्यायच्या भागाकडे नको. आणि मग ह्याच भावनेनं, निसर्गातल्या इतर गोष्टींकडे पाहा. झाडं, नद्या, वारे, आकाश, जमीन आणि शेवटी माणूस. माणसातलाही नको असलेला भाग दूर करायला शिका. ह्याची सुरुवात स्वत:पासुन करा. स्वत:तला नको असलेला भाग कोणता ? तर ज्यापायी आपला आनंद, प्रगती, निष्ठा आणि आत्मविश्वास ह्याला तडा जातो तो आचार, तो विचार, हा टाकायचा भाग .....

आपत्ती पण अशी यावी, की त्याचाही इतरांना हेवा वाटावा, व्यक्तीचा कस लागावा. पडून पडायचचं तर ठेच लागून पडू नये. चांगलं दोन हजार फुटांवरुन पडावं. माणूस किती उंचावर पोहोचला होता, हे तरी जगाला समजेल.

बायकोत काय नसतं ते अशा मैत्रिणीत असतं ?
ह्यासारख्या प्रश्नांची उत्तरं कशी द्यायची ?
माझ्या मते अशी मैत्रीण जी हवीशी वाटते
ती बायकोच्याऐवजी हवी असते,
हा समज चुकीचा आहे.
तिला बायकोने सुद्धा स्वीकारवं ही गरज असते.
तसं झालं नाही की होणाऱ्या यातना
फ़क्त मैत्रिणीला समजतात.
बायकोला समजत नाहीत.
नि:स्वार्थी मैत्रीण मित्राचा संसार उढळला जावा,
पण आपली मैत्री टिकावी
अशी कधीच अपेक्षा करीत नाही.
पण ही धडपडही बायकोपर्यंत पोहोचत नाही.
मैत्रीण मित्राच्या पत्नीची मर्जी
आणि प्रतिष्ठा सांभाळते,
पण तो समंजसपणा पत्नी दाखवत नाही.
बायकोचे मन धाब्यावर बसवून मैत्री जपणारे
महाभाग किती टक्के असतात आणि
किती टक्के स्त्री  पुरुष, त्याच्या वा तिच्या
मैत्रीला तिलांजली देतात, ह्या टक्केवारीत जाण्यात अर्थ नाही.
समजूतदारपणाच्या बाबतीत संसारातल्या साथीदारापेक्षा
मैत्रीतला जोडीदार वरचढ ठरला ह्याचा आनंदही चिरकाल उरत नाही,
कारण समजूतदार घटकालाच अन्याय सहन करावा लागला
हे शल्य पुसता येत नाही.

Identity cards सारखी विनोदी गोष्ट साऱ्या जगात नसेल. आपण आहोत कसे? हे खरं त्यांना हवं असतं. त्याऐवजी आपण दिसतो कसे ते पाहून ते आपल्याला ओळखतात.

एकाकीपण वेगळं, एकांत वेगळा.
परिसराचं मौन म्हणजे एकांत; आणि
परिवारात असतानाही पोरकं वाटणं हे एकाकीपण.
एकाकी वटलं, तर मनसोक्त रडावं.
अश्रू म्हणजे दुबळेपणा नव्हे.
पावसाळी ढग जसे बरसल्यावर हलके होतात.
आणि दिसेनासे होतात,
तसा माणूसही हलका होतो; आकाशाजवळ पोहोचतो.
असंच, कोणतं तरी दुःख पार केल्यावर तुकाराम
'तुका आकाशाएवढा' असं लिहून गेला असेल.

म्हातारी मला सांगत होती.
'मुली बघणं हा पुरुषांचा स्थायिभावच आहे.
बायकांकडे पहावं ही भावना जोवर जागती आहे, तोवर पुरुष हा पुरुष आहे. आता विनाचे वडील, तसं वय झालेलं, पण असे खिडकीजवळ उभे राह्यले की गुंग व्हायचे, मोठ्या प्रसन्नतेने रस्त्यावरच्या बायका पाहत रहायचे. ते तर पुरुषच, पण तुला गम्मत सांगते, एक दोनदा मी पण त्यांच्या जवळ जाऊन उभी राह्यले. रस्त्यावरून जाणाऱ्या पोरींकडे त्यांच्या म्हणजे तुम्हा पुरुष्यांच्या नजरेतून पहाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा बायांकडे पागल होऊन पहाणारे पुरुष मला पागल वाटेनासे झाले बघ!
आता तर रस्त्यावरच्या मुली पाहण्याचा मलाच छंद जडलाय.
बेभान करण्याचं तंत्र बरोब्बर शिकल्यात बघ पोट्ट्या. चित्रासारख्या राहतात बघ. मी तर गेल्या अनेक दिवसांत, कुरूप मुलगीच पाह्यली नाही.'
मी हसून विचारलं,
'आजी, तुमचे हे विचार एकदा माझ्या बायकोला ऐकवाल का?'
'मुळीच ऐकवणार नाही.'
'का?'
'तरुणपणात बेटा अहंकार असतो. आपली तुलना इतरांबरोबर होता कामा नये, असं वाटतं. त्यात काही गैर पण नाही. मी तरुण असताना माझ्या नवऱ्याला कमी छळलंय का? हे विचार आत्ताचे. म्हातारपणाचे. स्वत:च्या रूपाचा अहंकार जळाला तेव्हा इतर सौन्दर्य दिसायला लागलं.'

पावसातून भटकताना अंगावरचा शर्ट भिजतो तेव्हा काही वाटत नाही. तो अंगावरच हळू हळू सुकतो. तेव्हा त्याचंही काही वाटत नाही. सुकला नाही तरी ओल्याची सवय होते. पण म्हणून कोणी ओलाच शर्ट अंगात घाल म्हटलं तर कसं वाटतं?

निर्णय चुकीचा आहे की योग्य आहे हे काळावर मोजायचं की बुध्दीवर? तुम्हाला बुध्दिच नसेल तर पेपर सोडवायला संपूर्ण तीन तास नव्हे, तर अख्खा दिवस दिला तरी काय उपयोग? आपण सगळया गोष्टी वापरायला शिकतो, फक्त वेळ वापरायला शिकत नाही.

कोणत्या तरी एका क्षणापर्यंत पेशंट डॉक्टरचा असतो.
नंतर तो नियतीचा होतो.
कोणत्या क्षणी तो आपला होणार आहे हे नियतीला माहीत असतं.
पण कोणत्या क्षणी तो आपल्या हातून निसटणार आहे हे डॉक्टरला माहित नसतं. डॉक्टर व्हायचं म्हणजे या अन्यायाला तोंड देण्याची ताकद कमवावी लागते. अन्यायच हा!
कारण हा सामना 'आमनेसामने' होत नाही. फ़सवणूक करुन परभव गळ्यात मारला जातो ह्याचं दुःख होतं. विजय नियतीचाच होणार असतो. तिला लबाड्या करण्याचं काय कारण असतं?
पेशंट एकाएकी सुधारल्याच्या खुणा दाखवतो.
आणि मग हातोहात निसटतो.
आम्ही मग विझायला आलेल्या ज्योतीची उपमा देऊन गप्प बसतो.
कर्णाची बाजु अन्यायाची असतानाही, त्याला मरण ज्या परिस्थितीत आलं त्याचं दुःख होतं. प्रत्यक्ष भगवान कृष्ण पठीराखा असताना, कर्णाचा शेवट ह्या प्रकाराने करण्याची पाळी यावी?
डॉक्टरच्या हातून पेशंट निसटला की असंच काहीतरी वाटतं..

देशाची फाळणी, प्रथम माझ्या शरीराची फाळणी झाल्याशिवाय होणार नाही अशी वचनं देणा-या माणसाला 'राष्ट्रपिता' हि किताबत मिळाली. त्याने विश्वासघात केल्यावर लाखो संसार हे असेच उध्वस्त झाले. पित्याचं पद न पेलणारा माणूस श्वापदचं!

रातराणीचा सुगंध पलंगावर लोळता लोळता उपभोगू शकतो.
पण तुळस वृंदावनातच राहते.
तिच्यापुढे आपल्याला उभंच रहावं लागतं.

मूल जन्माला आलं की त्याला आई बाप जन्मभर पुरायला हवेत. दोघांच्याही प्रेमात जमीन अस्मानाचा फरक असतो. मूलाला काय हवयं ते आईला न सांगता समजतं. तर बापाला ती गोष्ट मागितल्याशिवाय समजत नाही. म्हणुनच हट्ट करून गोष्ट वसूल केल्याचा आनंद बापाच्या प्रेमामुळे मिळतो. मुलाच्या हातून एखादी चूक झाली तर आईला तो स्वत:चा अपमान वाटतो. पण बापाला, त्या चुकीचे परिणाम मुलालाच जास्त भोगावे लागतील याची चिंता वाटते. वार झाला तर आई जखमेवर फुंकर घालते. बाप वरच्यावर वार पेलून धरतो. म्हणूनच बालवयात एखादं मूल आईच्या प्रेमाला पारखं झालं तर गाभाऱ्यातली समई विझल्यासारखं वाटतं आणि त्या मुलाला जर बाप दुरावला तर त्याच देवळाचा कुणीतरी कळस काढून नेल्यासारखं वाटत. आईच्या माया मऊ शालीसारखी पण त्यनं ऊब भागत नाही. म्हणूनच आईच्या मायेच्या शालीवर बापाचं भरभक्कम ब्लँकेट हवं.

पोरगी म्हणजे झुळुक, अंगावरुन जाते, अमाप सुख देऊन जाते, पण धरुन ठेवता येत नाही.

म्हणायच मंगळसूत्र. मग त्या मण्यांचा रंग काळा का?
ते धवलसूत्र का नाही ? मृत्यूचा रंग काळा. जीवन बहूरंगी असतं. मरण सगळे रंग पुसून टाकतं. बालपण बहूरंगी, सासर एकरंगी आणि वार्धक्य बेरंगी हे सातत्याने स्त्रीच्या लक्षात रहावं म्हणून ते मणी काळे.

वेळ पुरत नसला की तो आपला सर्वात जवळचा मित्र असतो. मधे लुडबूड करत नाही. आपण त्याला वापरतो, पण तो स्वत:च अस्तीत्वही प्रकट करत नाही. पण वेळ जेव्हा उरतो, तेव्हा त्याच्यासारखा वैरी नाही. तो तुम्हाला उध्वस्त करतो. असे मोकळे क्षण प्रत्येकाच्या आयुष्यात येतात. ते क्षण मोकळे म्हणायचे, पण ते क्षण भकास असतात.

संधी हा प्रकारच पाऱ्यासारखा. म्हणजे कसा? तर दोन मित्र गप्पा मारीत बसले होते तेवढ्यात दार वाजल्याचा एकाला भास झाला. तो म्हणाला, मला दोन वेळा दार वाजल्याचा भास झाला. त्याचा मित्र म्हणाला, दोन वेळा ? मग ती संधी नसेल.

मखमलीचा अंगरखा घातला की बघणाऱ्याचे डोळे दिपतात. पण तो अंगरखा घालणाऱ्याला आतलं अस्तरच स्पर्श करीत असतं. तशा काही व्यथा.

एका क्षणामध्ये पत्नीची आई होते. नवऱ्याने त्यानंतर पिता व्हाव ही पत्नीची अपेक्षा असते. पण तसं घडत नाही. ह्याच कारण दिवस गेल्यापासून दिवस पुर्ण होइपर्यंत पत्नीने मातृत्वाचा छोटा कोर्स केलेला असतो. एकच विद्यार्थी असलेला वर्ग तिने नऊ महिने सांभाळलेला असतो. मूल आणि आई शाळेतच असतात आणि पुरुष शाळा सोडून अन्यत्र असतो. म्हणूनच त्याला पिता व्हायला वेळ लागतो. त्यात शाळेला कायमच कंटाळलेला नवरा वाट्याला आला तर संसारामध्ये तो बिनखात्याचा मंत्री असतो.

प्रश्नांपासून नेहमीच पळता येत नाही. कधी ना कधी ते पळणाऱ्याला गाठतातच. पळवाटा मूक्कामाला पोहचवत नाहीत. मूक्कामाला पोहचवतात ते सरळ रस्तेच .

सगळे कागद सारखेच.
त्याला अहन्कार चिकटला की त्याचे certificate होते.

बाह्यरुपावर काय आहे, असं म्हणण्यात काही अर्थ नाही. अंतरंगाचा विचार करायची वाट बाह्यरुपावरुनच जाते. “दिसण्यात काय आहे ? माणसाचं मन पाहावं” हा युक्तिवाद बुद्धीचा, तो मनाचा कौल नाही .

फाटकात उभं राहून तू हे सगळं बोललीस. अगदी महत्वाचं, जिव्हाळ्याचं बोलणं फाटकापाशीच होतं नाही का ? केशराच्या काड्या, क्वचित वेलदोड्याची पावडर सरबताच्या पेल्याच्या तळाशी राहतात तसं.

पारिजातकाचं आयुष्य लाभलं तरी चालेल, पण लयलुट करायची ती सुगंधाचीच!

पशू माणसांपेक्षा श्रेष्ठ आहेत. कारण ते instinct वर जगतात. बेदम वजन वाढलय म्हणून घारीला उडता येत नाही किंवा एखादा मासा बुडाला असं कधी ऐकलय का ?

नवरा बायको हे नातं असंच मोठं बिलंदर आहे. ह्या नात्यात थोडसं ऐकवायचं असतं, पुष्कळसं ऐकायचं असतं. पुष्कळदा नमायचं असतं, काही वेळा थोडा अधिकार गाजवायचा असतो, काही गोष्टींचा निश्चित अट्टाहास धरायचा असतो, तितक्याच गोष्टी पुष्कळ प्रमाणात सोडून द्यायच्या असतात. एक ना दोन, अनेक संकेत असतात. हे सगळे संकेत सांभाळताना, संसारातली लज्जत लुटायची असताना, दुसऱ्याला लुटून द्यायची असते.

बायकोपेक्षा मैत्रिण जास्त विश्वास ठेवते, म्हणूनच क्षमा करण्याची ताकद बायकोपेक्षा मैत्रिणीत जास्त असते. पुरूष संयमी आहे किंवा नाही हे फ़क्त मैत्रिण सांगू शकते, बायको नाही.

शस्त्रक्रिया होण्यापूर्वी रोगी घाबरलेला असतो. त्यातून तो बरा झाला की शिवलेली जखम तोच कौतूकानं दाखवत सुटतो

दोन माणसांना जवळ आणू असं निव्वळ ठरवून ती एकमेकांच्या जवळ येत नाहीत.ती मग सख्खी भावंड असली तरी ! रंगाच्या पेटीत कितीतरी रंग एकत्र असतात. एकाच मातीतून बनलेले रंग. एकाच पेटीत रहाणारे. पण त्यातले फार थोडे दुसऱ्या रंगात चांगले एकरुप होतात. ह्याला कोणि का ? म्हणून विचारले तर काय सांगायचं?

जाळायला काही नसले की पेटलेली काडीसुद्धा आपोआप विझते.

खर्च झाल्याचं दुख्ख नसतं, हिशोब लागला नाही की त्रास होतो.

सुखाचे क्षण हे पाऱ्याप्रमाणे असतात.
हातात आलेसे वाटतात तेव्हा निसटून गेलेले असतात.

आयुष्याची व्याख्या अत्यंत सोपी आहे. दोन गरजांची स्पर्धा म्हणजे आयुष्य. ज्याची गरज अगोदर संपते तो तुम्हाला सोडून जातो.

आठवणी ह्या मुंग्यांच्या वारूळाप्रमाणे असतात. वारूळात पाहून आतमध्ये किती मुंग्या असतील याचा अदमास होत नाही पण एका मुंगीने बाहेरचा रस्ता धरला की एकामागोमाग एक अश्या असंख्य मुंग्या बाहेर पडतात. आठवणीचं ही तसचं आहे.

मैत्रितली एक विलक्षण ताकद जर कोणती असेल तर, त्यातली सहजता. त्या सहजतेमधूनच सुरक्षितपणाची साय आपोआप धरते. साय दूधातुनच तयार होते आणि दूधावर छत धरते. साय म्हणजे गूलामी नव्हे. सायीखालच्या दूधाला सायीच दडपण वाटत नाही. मैत्रीचा प्रत्येक टप्पा हा व्यक्तीमत्वाचा नवा उत्कर्ष बिंदू ठरावा. आपल्याला लहानपणचे आठवते त्या आधिपासूनचं आपण मैत्रित पडलेले असतो.

माणसाचं जीवन अतिशय मोहक सुंदर व नाजूक धाग्यांनी परमेश्वराने विणलेल असतं. ते आपण फार काळजीपुर्वक जपावं लागतं. त्यातला एक धागा जरी उसवला तरी तो तितक्याच कुशलतेने विणला जात नाही. उलट त्याच्या आसपासचे धागेच नकळत उसवले जातात. आणि मग पडणारं छिद्र मनाला , हृदयाला फार मोठी जखम करतं. आयुष्यातली सारी गोडीच निघून जाते नि मग वाटत मनाची ही पोकळी भरून कशी (निघणार) काढणार ?

कोणतंही समर्थन मूळ दु:खाची हकालपट्टी करू शकत नाही. वर पट्टी बांधायची, ती जखम झाकण्यासाठी. आत जखम आहे, ती ज्याची त्याला ठसठसत असतेच.

शरण आल्याने फरक पडत नाही. रिअलायझेशन केवळ पाय पकडून होत नाही. क्षमा मागणारा माणूस जास्त धोकादायक. क्षमा मागणं, चूक कबूल करणं हा बहाणा असतो. पुन्हा पहिल्याच मार्गावर जाण्याचा परवाना असतो. कारण वाकावं लागलं ह्याचा खोलवर राग असतो. कुणाचा तरी अपमान केला, असभ्य उद्गार काढले, आपल्या प्रतिमेला तडा गेला, तो सांधण्यासाठी माणुस क्षमा मागतो. आपण मूळचे तसे नाही आहोत, हे ठसवण्याचा तो दुबळा प्रयत्न असतो. क्षमा मागण्याने पुन्हा पहिल्यासारखं वागायची मोकळीक मिळाते. त्याऐवजी आपल्याला क्षमा कोणत्या कारणासाठी मागावी लागत आहे, ह्याचं आत्मनिरीक्षण करावं

माणूस जन्मभर सुखामागं, ऐश्वर्यामागं धाव धाव धावतो. पण ह्या धडपडीत तो सुखी नसतो, आणि धडपड यशस्वी ठरून, हवी ती वस्तू मिळाल्यावरही तो सुखी नसतो. ह्याचं करण तो निर्भयता शिकत नाही. नेहमी माणसाला कशाची ना कशाची सातत्याने धास्ती वाटत राहते. तो जर निर्भय व्हायला शिकला तर जीवनातली गोष्ट नव्याने समजेल. माणसं, नद्या, डोंगर, समुद्र, सगळ्यांचा अर्थ बदलेल. आकाशाकडे सगळेच बघतात. पण त्रयस्थासारखं ! म्हणूनच ते जरा भरून आलं किंवा विजेचा लोळ कोसळताना दिसला की माणसं पळत सुटतात. आकाशाकडे पाहायचं ते आकाश होऊन पाहावं म्हणजे ते जवळचं वाटतं. 'विराट' ह्या शब्दाचा अर्थ तेव्हा समजतो. 'अमर्याद' शब्द पारखायचा असेल तर समुद्र पाहावा. 'विविधता' शब्द समजून घ्यायचा असेल तर 'मणूस' पाहावा. पण तोही कसा, तर आतून आतून पाहावा. मग माणसांची भीती उरत नाही. अगदी हलकटातला हलकट माणूसदेखील हलकट म्हणून आवडतो. जीवनावर, जगावर, जगण्यावर असं प्रेम केलं म्हणजे सगळं निर्भय होतं. उपमा द्यायची झाली तर मी विजेचीच उपम देईन. पृथ्वीची ओढ निर्माण झाली रे झाली की ती आकाशाचा त्याग करते. पृथ्वीवर दगड होऊन पडते. पण पडण्यापासून स्वत:ला सावरत नाही आणि तेजाचाही त्याग करीत नाही. प्रेम करताना माणसानंही असं तुटून प्रेम करावं. डोळे गेले तरी चालतील पण नजर शाबूत हवी. स्वर नाही सापडला तर नाही, पण नाद विसरणार नाही, पाय थकले तरी बेहत्तर पण 'गती'ची ओढ टिकवून धरीन, ही भूक कायम असली की झालं! आयुष्यात ही भूक जिवंत ठेवावी आणि निर्भयतेने पुरी करीत राहावं.

मला हेही माहीत आहे की, अखंड उत्साह, शोधक नजर, वक्तृत्व, प्रवासाची विलक्षण हौस हे सगळे गुणविशेष व्हिटॅमिनच्या गोळ्या खाऊन येत नाहीत. कलमी आंबा हा मातीचाच हुंकार असतो. तशा काही काही व्यक्ती ही मातीला पडलेली स्वप्नं असतात. वासुदेव बळवंत फडके, सावरकर, टिळकांसारखे खरेखुरे क्रांतिकारक, विचारवंत, लता आशा सारखी ३ तपांच्या वर स्वरांच्या संततधारांनी चिंब करणाऱ्या पार्श्वगायिका, बडे गुलाम अलीखाँपासून पं. भिमसेनांपर्यंतचे गायक, बाबा आमट्यांपासून शिवाजीराव पटवर्धनांपर्यंत खरेखुरे मानवतेचे पुजारी, अशी सगळी माणसं पाहिली की, 'सुजलां सुफलां'चा अर्थ सापडतो. राहिलेल्या सगळ्या जनगणात जमिनीत फाळ खुपसणारे आहेतच. पण जेव्हा जमिनीलाच प्रसववेदनांचा मोह होतो, देठालाच जेव्हा रोमांच आवरेनासे होतात तेव्हा कळीचा हुंकार उमटतो त्याप्रमाणे धरित्री अशा काही माणसांना जन्माला घालते.

ह्या जगात पुरुषार्थ ह्या शब्दाचा अर्थ समजलेले पुरुष फार, म्हणजे फारच मोजके आहेत. पुरुषार्थ म्हणजे रसिकता. जबरदस्ती नव्हे, शारीरिक ताकद नव्हे, तर मानसिक ताकद. ज्याला ही मानसिक रसिकता समजली त्यालाच पुरुषार्थ समजला. असा पुरुष, पुरुष असला तरीही कोमल असतो. तो कुणावरही जबरदस्ती करीत नाही.

ज्याला गरज निर्माण होते त्याला ती एकदम लाचार, दुबळा बनवते. आणि जो ती गरज पुरवू शकतो त्याला ती अचाट सामर्थ्यवान आणि उद्दाम बनवते.

समाजाला कळणार नसेल तर कोणतीही व्यक्ति कोणतही पाप करील.

अनेक समस्या, त्या क्षणी सुचेल त्या मार्गाने सोडवाव्या लागतात. थोडा अवधी लोटल्यावर मग कायमचा उपाय शोधावा. दूध अचानकपणे, म्हणजे आपण तंद्रीत असताना, कोणत्या तरी क्षणी लाट अंगावर येते, त्या वेगाने वर काठापर्यंत येतं. चिमटा शोधायला वेळ नसतो. अशा वेळेला पाण्याचा शिडकावा करुन ते तिथल्या तिथे शांत करायचं असतं. थांबवायचं असतं. मग सावकाश चिमटा शोधावा, उसंत घेऊन ते खाली उतरवावं. तसंच काहीसं.. अनेक समस्यांचं...

'आपण इथून आता सात पावलं चालू. आशीर्वाद द्यायला ही आपली नवी वास्तू आहे. पावलागणिक ती 'तथास्तु' म्हणत राहील. तुझ्या दादांची साधना तुझ्या पाठीशी आहे. मरताना दिलेला बाबांचा आशिर्वाद मलाही सावरील. मी आस्तिक आहे की नास्तिक ह्याचा मी कधी शोध घेतलेला नाही. मी श्रद्धावंत मात्र जरूर आहे. सौंदर्य, संगीत, सुगंध, साहित्य ह्या सर्वांसाठी मी बेभान होतो. पण माझी जमीन कधी सुटत नाही. मी माणूस आहे ह्याचा मला अभिमान वाटतो. मला परमेश्वर व्हायचं नाही. नवऱ्याला देव वगैरे मानणाऱ्यांपैकी तू आहेस की नाहीस हे मी परिचय होऊनही विचारलं नाही. तशी नसलीस तर उत्तमच. पण असलीस तर इतकचं सांगेन, की मला देव मानायचा प्रयत्न केलास तर तो माझ्यावर फार मोठा अन्याय होईल. मला माणूसच मान म्हणजे कळत - नकळत होणारे अपराध क्षम्य ठरतील. कुणाचंही मन न दुखवणं हीच मी देवपूजा मानतो. जिवात जीव असेतो मी तुला सांभाळीन. आता सांभाळीन हा शब्द चुकीचा आहे. त्यात अहंकार डोकावतो. तेव्हा इतकचं सांगेन की आपल्या ह्या घरात, संसारात, तू चिंतेत असताना मी मजेत आहे असं कधी घडणार नाही आणि शेवटचं सांगायचं म्हणजे मला पत्नी हवीच होती. मात्र पत्नी झाल्यावर तुझ्यातली प्रेयसी सांभाळ. मला सखी हवीच आहे. होशील ?'

माणसांनी आपलं आयुष्य इतकं धावपळीचं, दगदगीचं आणि अत्यंत वरवरचं करून घेतलं आहे. ही माणसं अशीच. यांना साय हवी, दूध तापवण्याचा खटाटोप नको. सुगंध हवा, पण रोपट्याची मशागत नको. मुलं हवीत, पण संगोपनाची यातायात नको. गती हवी, पण प्रगती नको. प्रसिद्धी हवी, सिद्धी नको. ही माणसं आयुष्य काढतात, जगत नाहीत. चालणारा माणूसच फक्त पायाखाली कीडामुंगीची हत्या होत नाही ना हे बघतो. धावणारा माणूस फक्त तुडवण्याचं काम करीत धावतो.

माणूस जेव्हा तरूण असतो तेव्हा तो वकिल असतो, डॉक्टर असतो, इंजिनीयर असतो, असा कुणी कुणी असतो. पण वार्ध्यक्यात तो फक्त म्हातारा आणि म्हाताराच असतो.मुलं आपण मागुन घेतो, म्हातारपण नको असताना येतं. जे न मागता येतं त्याची किंमत कशी राहणार? आंब्याच्या झाडाला मोहोर येणं बंद झालं तर ते शंभर वर्ष जगून काय उपयोग? त्यात खुद्द त्या झाडालाही आनंद नाही.

बायको म्हणजे कशी हवी? आपण बिथरलो तर आपल्याला सावरणारी हवी, स्वतःच बिथरणारी नको. थोडक्यात म्हणजे पेपरवेट सारखी हवी. खालचे कागद फडफडतील पण ती स्वतः गडगडणार नाही, चळणार नाही, नी खालचे कागदही उडू देणार नाही.

स्वप्न संपलं की सत्य बोचू लगतं. उदबत्त्या जळून गेल्या की मागे राखेचा सडा उरतो. राखेला सुगंध नसतो.
स्वप्नाला सूत्र नसतं.
तरी मी त्याला विचारलं,
'स्वप्नांवर माणूस जगतो का रे ?'
'नाही. स्वप्नांवर माणूस झोपतो, रमतो. पण जाग येईपर्यंत ! जागेपणीही उराशी स्वप्न बाळगली तर परत झोपायची वेळ येते माणसावर !'
मी बुवा स्वप्नांवरच जगतो. स्वप्नांचा आणि सुगंधाचा फार जवळचा संबंध असतो.'
'बरोबर आहे, शेवटी दोन्हीची राख होते.'

'मी तुझ्याकडे आत्ता सरळ सरळ बघतोय. बाकीचेही बघताहेत.तुला पुरुषांच्या नजरेची, बघण्याची चीड नाही का येत ?' 'का यावी ? मी स्विमिंग ड्रेसमध्ये असताना पुरुष बघणारच. त्यांनी बघावं म्हणून मी इथं येत नाही. इट इज द पार्ट ऑफ द गेम! पुरुष पहाणारच. स्वाभाविक गोष्टींवर चिडण्यात अर्थ च नसतो. भुंगे जमावेत म्हणून कमळ फुलत नाही, आणि एखादं कमळ पकडायचं असं ठरवून भुंगे भ्रमण करीत नाहीत. फुलणं हा कमळाचा धर्म, भुलणं हा भुंग्याचा धर्म.जाणकारांनी, रसिकांनी कमळाकडे पाहावं, भुंग्याकडे पाहावं आणि फुलावं कसं आणि भुलावं कसं हे शिकावं.'

स्पर्शसुख म्हणजे प्रेम नक्कीच नाही. तो प्रीतीचा मुळ रंग नाही. तो नुसता अभिलाषेचा तवंग ! एक सवंग लालसा ! जाता येता भेटत राहते, जाणवते. स्पर्शाची ही लालसा रोज ऑफिसला जाताना लोकलमध्ये सहन करावी लागते. रस्त्याने चालताना लादली जाते. बुकिंग क्लार्कने तिकीट देताना स्पर्श करावा, बस कंडक्टरने तेच, वाण्याने पुड्या देताना तेच, ऑफिसरने फाईल देताना तेच. हीच लालसा ऑफिसच्या लिफ्टमध्येसुद्धा सुटाबुटात चिकटून जाते. वर पुन्हा 'सॉरी'चं गुलाबपाणी शिंपडायचं आणि एक ओशट हास्य. सगळीकडेच ही लालसा थैमान घालताना दिसते. ऑफिसच्या कामासाठी फोन करावा तर पलिकडचा पुरुषी आवाज अकारण मवाळ होतो. नजरा तर दुसरं काही ओकतच नाहीत. स्त्रीदेहावर त्या अर्थपूर्ण नजरांची पुटं चढलेली असतील पुटं ! भारतीय युद्धसमाप्तीनंतर श्रीकृष्णाने अर्जुनाला प्रथम रथामधून उतरायला सांगितलं. आर्जुनाला नवल वाटलं.तरी कृष्णाचं ऐकून तो उतरला. त्यानंतर श्रीकृष्ण उतरताच, अर्जुनाचा रथ जळून गेला. त्यावर श्रीकृष्णाने सांगितलं. 'कौरवसैन्याने टाकलेल्या अस्त्रांचा परिणाम रथावर झालेला होता. अगोदर मी जर उतरलो असतो, तर हा रथ तुझ्यासकट जळून गेला असता.' आयुष्यभर स्त्रीदेहाचं संरक्षण असाच कुणी अजात कृष्ण करीत असला पाहिजे. नाहीतर पुरुषांच्या नजरांनी तो देह चितेवर चढण्यापूर्वी जळून गेला असता.

सर्वात जीवघेणा क्षण कोणता ? खूप सद्भावनेनं एखादी गोष्ट करायला जावं आणि स्वत:चा काहीही अपराध नसताना पदरी फक्त वाईटपणाच यावा, सद्हेतूचीच शंका घेतली जावी, हा!

निर्णय घेता न येणं ह्यासारखा दुसरा घातक दोष नाही. निर्णय न घेण्यापेक्षा चुकीचा निर्णय घेणं अधिक बरं. चुकीचा निर्णय घेणाऱ्या माणसांनी जीवनात यश मिळवलेलं आहे. परंतु जो निर्णय घेऊ शकत नाही त्याचं मन नेहमी हे करू की ते करू ह्या गोंधळात गुंतलेलं असतं. मात्र हा मनुष्य कधीही यशस्वी झाल्याचं ऐकिवात नाही. ज्याला निर्णय घेता येत नाही, त्याला कृती करता येत नाही. आणि ज्याला कृती करता येत नाही, त्याला कोणत्याही क्षेत्रात यश मिळवता येत नाही.

प्रत्येक सौख्याची किंमत त्याच्या मूल्यमापनाइतकी असते. काहीही फुकट नसतं आणि कोणताही सौदा स्वस्तात होत नाही. काही गोष्टींची किंमत अगोदर मोजावी लागते, तर काहींची नंतर !

एकदा केंव्हा तरी शांतपणे बसावं आणि वयानुसार आपण काय काय गोष्टी सोडल्या ह्याचा आढावा घ्यावा. मग लक्षात येतं, की आपण गाभुळलेली चिंच अनेक वर्षात खाल्लेली नाही. जत्रेत मिळणारी पत्र्याची शिट्टी वाजवलेली नाही. चटक्यांच्या बिया घासुन चटके द्यावेत असं आता वाटत नाही, कारण परिस्थितीने दिलेले चटके सोसतानाच पुरेवाट झालेली आहे. कॅलिडोस्कोप पाह्यलेला नाही. सर्कस मधला जोकर आता आपलं मन रिझवु शकत नाही, तसचं कापसाची म्हातारी पकडण्याचा चार्मही राह्यलेला नाही. कापसाच्या म्हातारीने उडता उडता आपला 'बालपणीचा काळ सुखाचा' स्वत:बरोबर कधी नेला ते आपल्याला कळलंच नाही. आता त्या ट्रिप्स नाहीत. दोन दोन मुलांच्या जोड्या करुन चालणं नाही. विटीदांडु नाही. साबणाचे फुगे नाहीत. प्रवासात बोगदा आला तर एक अनामिक हुरहुर नाही..... त्या उडणाऱ्या म्हातारीने हे सगळे आनंद नेले. त्याच्या बदली तिचं वार्धक्य तिने आपल्याला दिलं. म्हणुनच ती अजुन उडु शकते. आपण जमिनीवरच आहोत.

सगळे वार परवता येतात पण अहंकारावर झालेला वार परवता येत नाही. आणि पचवताही येत नाही.

'स्त्री' ला जन्माला घालताना परमेश्वराने तिला विचारलं,
'तुला बुद्धी हवी का सौंदर्य ?'
तेव्हा स्त्री म्हणाली,
'बुद्धीची गरज नाही, सौंदर्यच दे!'
'का?'
'बुद्धीच्या सामर्थ्यावर सौंदर्य मिळवता येत नाही, पण सौंदर्याच्या जोरावर बुद्धी विकत घेता येते'

'माझी परमेश्वरावर अपार भक्ती आहे. त्याने निर्माण केलेली सृष्टी पहा. तिथं सगळं अमाप आहे, विराट आहे, प्रचंड आहे. इथं लहान काहीच नाही. एक माणूस पाहा! केवढी विराट निर्मिती माणूस म्हणजे !पर्वताशी जेवढ्या प्रचंड, समुद्र जेवढा अमर्याद, वनश्री जेवढी गूढ, तसाच माणूस - प्रत्येक माणूस -- प्रचंड, अमर्याद आणि गूढही. माणसाला बहाल केलेली पंचेंद्रियं हीच त्याची साक्ष. नजरेची दुनिया, नादाची दुनिया आणि स्पर्शाची दुनिया. सगळं विराट आणि म्हणूनच नेहमी वाटतं की ज्या परमेश्वराने जीवन एवढं विराट केलं तो त्या विराट जीवनाचा शेवट जीवनापेक्षा लहान गोष्टीने करणार नाही.'

'माझी श्रद्धा आहे, की परमेश्वराने निर्माण केलेला मृत्यू हा जीवनापेक्षा विराट आहे, जीवनापेक्षा लोभस असणार.'

आपल्याला जिवापाड
आवडणाऱ्या माणसाचं मूल वाढवणं,
आपल्या जोडीदाराला अंशरूपाने
स्वत:च्या शरीरात जागा देण्याच्या
आनंदाची बरोबरी कशाशीच होऊ शकत नाही.
अपत्याला वाढवताना प्रत्येक स्त्री
काही प्रमाणात आपल्या नवऱ्याचीही
आई होत असावी.
पहिलं मूल होण्यापूर्वी ती केवळ प्रेयसी असते.
कायम जीव टाकावा अशा पात्रतेचा
नवरा लाभला तर दिवसाचे किती क्षण
ती नवऱ्याचाही अपत्यासारखा सांभाळ करते
हे कोणत्याही पुरुषाला कळायचं नाही.
स्त्री जेव्हा जेव्हा संघर्षासाठी उभी असते
तेव्हा तेव्हा ती भले पत्नी असेल,
पण जेव्हा जेव्हा ती क्षमा करते
तेव्हा तेव्हा ते नातं आईचचं असतं.

अक्षता ह्या शब्दातलं प्रत्येक अक्षर महत्त्वाचं आहे.
अ = अर्पणभाव
क्ष = क्षमाशीलता
ता = तारतम्य
हे तीन गुण दोघांजवळ हवेत.
प्रेमातील नवी नवलाई आता काहीशी कमी झाली असेल तर दोघांनी आपापल्या डोळ्यांवरच्या पट्ट्या उतराव्यात. एकमेकांच्या वृत्तींचा खरा मागोवा घ्यावा. सप्तकातले किती सूर जुळतात ते भाबडेपणा टाकून तपासावं. मुख्य म्हणजे आपण कोणत्या गोष्टींना, किती प्रमाणात मुरड घालु शकणार आहोत त्याचा ह्याच कालावधीत शोध घ्यावा. संघर्षाच्या जागा हेरून ठेवाव्यात. मुरड घालणं हा सहजधर्म व्हायला हवा. कात टाकली की साप तिकडे वळूनही बघत नाही, इतक्या सहजतेने आपण एकमेकांसाठी काय टाकु शकतो, त्याचं संशोधन च करायला हवं. एकमेकांना टाकण्यापेक्षा,